भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100 ONE HUNDRED RUPEES

रु. 100

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2019 ◑ UV 513754

अनुक्रमांक 3363 दिनांक 27/5/19 रुपये 100/-

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे करार

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे अनुच्छेद क्रं.

मुद्रांक वापरणाराचे संपूर्ण नांव योगेश भारत सावंत

संपूर्ण पत्ता बारामती

हस्ते व्यक्तीचे संपूर्ण नांव

पत्ता

उपकोषागार कार्यालय बारामती
27 MAY 2019
उपकोषागार अधिकारी बारामती

मुद्रांक धारकाची/हस्ते व्यक्तीची सही

सही
सौ. उमा सुनील महाजन
मुद्रांक विक्रेता, परवाना क्रमांक-२२०३०१२
पत्ता-तहसिल कंपाऊंड, बारामती

# क रा र ना मा

## उपहारगृह (कॅन्टीन) चालविण्याचा करारनामा

मा.श्री.जवाहर मोतीलाल शाह,
सचिव, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,
बारामती, जि. पुणे

करार लिहून घेणार

श्री. योगेश भारत सावंत
ओम श्री रूद्र सिद्धी केटरर्स
बारामती, जि. पुणे

करार लिहून देणार

कारणे करारनामा लिहून देतो की, बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या आवारातील अनेकान्त एज्युकेशन संस्थेच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या आवारातील कॅन्टिन विद्यार्थी विद्यार्थीनी व स्टाफ यांच्या सोयीसाठी चालविण्याकरिता मी मागणी केल्यावरुन खालील अटींवर आपण मला देत आहात. त्या अटी पुढीलप्रमाणे आहेत व त्या मला मान्य आहेत.

१. **सदर कॅन्टिन दि. ०१/७/२०१९ ते ३१/५/२०२० अखेर (म्हणजेच ११ महिन्यांकरिता) चालविण्यांस मिळणार आहे.**

२. सदर मुदतीकरिता जागा भाडे दरमहा रु. ५,०००/–(रुपये पाच हजार फक्त) प्रमाणे पहिल्या सहा महिन्यांचे भाडे एकूण रु. ३०,०००/– (रूपये तीस हजार फक्त) माझा व्यवसाय सुरु करण्यापूर्वी भरण्याचे मला मान्य आहे. तसेच प्रत्यक्ष येणारे लाईट बीलाच्या रक्कमेचा संस्थेकडे दरमहा १० तारखेपर्यंत भरणा करेन. तसेच पाणी पुरवठयाबद्दल दरमहा रू. १००/– प्रमाणे संस्थेकडे जमा करेन.

३. कॅन्टिन चालू करण्यापूर्वी मी व्यवसाय नोंदणी, नगरपालिका व प्रांत ऑफिसकडून नियमाप्रमाणे रितसर परवानगी घेण्याची जबाबदारी माझी राहील व ती मी पार पाडीन.

४. स्वयंपाकास लागणारी सर्व प्रकारची भांडी व उपकरणे मी स्वत:ची वापरेन.

५. कॅन्टिन चालवितांना कॅन्टिन शुल्क ग्राहकाकडून वसूल करण्याची सर्व जबाबदारी माझी/माझेवरच राहील.

६. कॅन्टिनमध्ये व माझ्यासाठी इतरत्र काम करणारे सर्व कर्मचारी निरोगी व निर्व्यसनी असतील. मी कोणताही बाल कामगार ठेवणार नाही. तसेच कॅन्टिनमधील कामगारांना आकाशी निळया रंगाचा ॲप्रन व पायामध्ये एकाच रंगाच्या सपाता स्लीपर्स मी स्वखर्चाने देईन. त्याचप्रमाणे मेसमधील कामगारांची नांवे, पत्ते, फोटो इ. माहिती मी आपल्या कार्यालयात जमा करीन. तसेच वसतिगृह समितीने ठरविल्याप्रमाणे मी माझ्या कॅन्टिनमधील सर्व कर्मचाऱ्यांना माझ्या केटरींगचे नाव असलेला सर्वांसाठी एक पोषाख देईन. त्याबद्दल मला कोणतीही अडचण नाही.

७. कॅन्टिनरुम, स्वयंपाकघर व माझ्या वापरातील आजूबाजूचा परिसर हा सतत स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी माझी राहील. ते काम माझ्या कामगारांकडून प्रतिदिनी करुन घेईन.

८. कॅन्टिनमधील कामगारांचे आवश्यक ते मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट दर तीन महिन्याला घेईन व ते रितसर आपणांकडे सादर करेन.

९. कोणत्याही विद्यार्थ्यांबदद्ल तक्रार निर्माण झाल्यास त्याबदद्ल संबंधित विद्यार्थ्यास काहीही न बोलता मी माझी लेखी तक्रार होस्टेल कमिटीकडे मी देईन. त्यांनी सदरची तक्रार होस्टेल समितीच्या सभेमध्ये मांडून त्याचे जे निराकरण होईल, ते मला मान्य राहील.

....३....

१०.कॅन्टिनमधील पदार्थसाठी चांगल्या प्रतीचे धान्य, तेल व भाजीपाला यांचा वापर करीन. कॅन्टिन करिता लागणारे धान्य तांदुळ, खाद्यतेल इत्यादी रेशनिंगचे मुळीच वापरणार नाही. ते धान्य निवडून स्वच्छ करुन वापरेन व चपातीसाठी चांगल्याप्रतीचा गहू वापरेन. नाष्टयाची गुणवत्ता ही कायम स्वरुपी चांगली ठेवीन व गुणवत्तेमध्ये घसरण झाल्यास सदरहू करार रद्द केला जाईल व त्याचे सर्व अधिकार होस्टेल समितीस असतील याची मला जाणीव आहे.

११.वरील कॅन्टिनमध्ये फक्त शाकाहारी पदार्थ शिजविले जातील व दिले जातील. तेथे अंडयाचा वा इतर अखाद्य (मांसाहारी) पदार्थांचा वापर बिलकूल केला जाणार नाही.

१२.संस्थेचे होस्टेल कमिटी सदस्य, प्राचार्य किंवा प्रतिनिधी यांना वेळोवेळी आवश्यक बाबींची तपासणी करण्याचा अधिकार मला मान्य आहे व याकामी मी त्यांना सर्व आवश्यक सहकार्य करेन.

१३.वरील कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास करार रद्द केला जाईल तसेच डिपॉझीट जप्त केले जाईल हे मला मान्य आहे.

१४.कॅन्टिनमध्ये बिडी, सिगारेट, तंबाखू, मावां, मद्यपान, अल्कोहोल व नशीले पदार्थ वा तत्सम पदार्थ विकले जाणार नाहीत. मी स्वत: त्याचे सेवन करणार नाही व कर्मचाऱ्यांना सेवन करु दिले जाणार नाही.

१५.मला कॅन्टिन चालविण्याचा केवळ परवाना आहे. त्यान्वये जागेवर वा होस्टेलच्या कोणत्याही भागावर माझा कोणताही हक्क हितसंबंध वा भाडेकरूंचा हक्क नाही.

१६.कॅन्टिन चालविण्याचा परवाना मला तबदील करण्याचा हक्क नाही. मी स्वत: मेस चालवेन व ती अन्य कोणामार्फत वा कोणासही पोट कराराने देणार नाही. संस्थेद्वारे वेळोवेळी करण्यांत येणारे नियम, अटी, सूचना मला मान्य असतील. संस्था कोणत्याही वेळी हा करार रद्द करू शकते हे मला मान्य आहे. वरील सर्व अटी मला मान्य असून याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

१७.मी चालवित असलेले कॅन्टिनमधील वॉश बेसिन स्वच्छता आणि मेस मधून बाहेर जाणारे ड्रेनेजची स्वच्छता ही सर्वस्वीपणे मी माझ्या स्वखर्चाने करेन. यासंदर्भात या ठिकाणी मी असे लिहून देत आहे. ड्रेनेजचे सर्व पाईपलाईन मोठया आकाराच्या असून त्यात कोणत्याही प्रकारचे अन्न किंवा खरकटे टाकले नाही तर ड्रेनेज लाईन चोकअप होत नाही. तरी सदर ड्रेनेजमध्ये माझ्या मेसमधून अन्न किंवा खरकटे जाणार नाही याची मी काळजी घेईन आणि जरी ड्रेनेजपाईप चोकअप झाल्याच तर त्या आम्ही स्वखर्चाने स्वच्छ करून घेईन. अशी हमी देतो.

१८.कॅन्टीनचे दर वेळोवेळी संस्थेच्या कॅन्टीन समितीने ठरवून दिलेल्याप्रमाणेच आकारेल. करार मुदतीमध्ये परस्पर दरवाढ करणार/मागणार नाही.

ठिकाण :– बारामती

दिनांक : – ०१/०७/२०१९

ANEKANT EDUCATION SOCIETY, BARAMATI
ESTD
1961

करारनामा लिहून घेणार
श्री.जवाहर मोतीलाल शाह, सचिव
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

करारनामा लिहून देणार
श्री. योगेश भारत सावंत
ओम श्री रुद्र सिद्धी केटरर्स
बारामती, जि. पुणे



साक्षीदार –

१. V.D. Mahamuni

२. Prasad Magdum